

REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म

वर्ष १०वे अंक ४था

जानेवारी २०२२

२०२२च्या वर्षात श्री स्वामी समर्थांच्या आशिर्वादाने एका नव्या साधनेच्या पर्वाला सुरूवात करूया. सगळ्या साधकांना नव वर्षाच्या शुभेच्छा!

– अजित सर

email: reikibramhamasik@gmail.com



# शंकीत हो रे मना, भयभीत हो रे मना..

स्वामीभक्तांना हे शीर्षक कदाचित विपरित जाणवत असेल. थोडेसे धक्कादायकही जाणवेल. सामान्यत: स्वामीभक्तांना स्वामींचे निर्भय हो रे मना, नि:शंक हो रे मना हे कवन ऐकण्याची सवय आहे. परंतु आजूबाजूला पाहीले तर करोनाच्या नावाने चांगभले म्हणत भीतिचा गुलाल आणि शंकांचे ढोल बडवत मिरवणूका निघालेल्या दिसत आहेत. भीति आणि शंका एकदा का लोकांच्या मनात भरवल्या कि मग आपण आपल्या स्वार्थाच्या पोळ्या भाजायला मोकळे असा समज बऱ्याच नेत्यांचा आणि अभिनेत्यांचा आहे. त्याप्रमाणेच जगावर राज्य गाजवायला उत्सुक असलेले हे महाजन लोकांच्या मनात भितीचे अंकुर पेरायला सज्ज झालेले दिसत आहेत. कसेही करून समाज व्यवस्था स्थिर होवू द्यायची नाही आणि नवनविन खोट्या गोष्टी पसरवून पुन्हा एकदा स्थैर्याला खिळ घालायची हा नवा पायंडाच जणू दुर्जनांनी पाडलेला दिसतोय.

अशा परिस्थितीत साधकाला आपली साधना स्वत:ला स्थिर ठेवण्यासाठी आणि कोसळणाऱ्या समाज जीवनाला एक आशा देण्यासाठी वाढवावी लागेल. काहीही झाले तरी आपल्या आंतरकक्षात भितीला आणि शंकांना थाराच द्यायचा नाही असा दृढ निश्चय करून साधकांनी आपले पाय आता आत्मभावामध्ये दृढपणे रोवायला पाहीजेत. किनेसिओलॉजी शास्त्राप्रमाणे गेल्या काही वर्षांत ७८% लोक चैतन्याच्या किमान पातळीच्या खाली जगत आहेत परंतु चिखलातील ह्या लोकांना सावरण्याचे आणि मानवता जीवंत ठेवण्याचे महान कार्य उर्वरित २२% साधक लोकांनी केले आहे. असेही असू शकते कि गेल्या दोन वर्षांच्या कठीण परिस्थितीत ७८% चे परिमाण कदाचित वाढले असेल. पुन्हा एकदा मानव जात गर्तेमध्ये जायची शक्यता निर्माण झाली आहे. अशावेळी साधक लोकांवरची जबाबदारी आणखीनच वाढली आहे. हे आता आपणा सर्वांना ध्यानात आले पाहीजे. आता साधकाला ढळून जाणे मनुष्यजातीला परवडणारे नाही. आपल्याला आपल्या मार्गावरून न ढळता, न घसरता आपल्या अंतिम ध्येयाकडे एकाग्रतेने पाहून त्या ध्येयाच्या दिशेने पावले टाकायला लागतील. आता आळस करून चालणार नाही. आता आपल्या साधनेची गति वाढवायला लागेल, श्रद्धा जागवावी लागेल, आपल्या भावनिक प्रतिक्रिया संयमित ठेवाव्या लागतील. ही आता काळाची गरज आहे. अंधकार वाढत असताना आपल्यातल्या आंतरिक प्रकाशाला आता चहूदिशांना पसरू द्यायला हवे. आपली भूमिका एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे असायला हवी. झंझावाती वादळात आणि खवळलेल्या समुद्रात सापडलेल्या दिशाहीन नौकांना आता आपला प्रकाश मिळायला हवा जेणेकरून समुद्रातील खडकांवर आपटून मानवतेची नौका ह्या भवसमुद्राच्या तळाला जाऊ नये. आता येणाऱ्या २०२२च्या वर्षात श्री स्वामी समर्थांच्या आशिर्वादाने एका नव्या साधनेच्या पर्वाला सुरूवात करूया. सगळ्या साधकांना नव वर्षाच्या शुभेच्छा!

अजित सर

डिसेंबर २८, २०२१

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान



अनुवादक : श्री प्रांजल जोशी, पुणे

## आत्मा आणि त्यावर लादलेली बंधने

आपले अस्तित्व अमर्याद अन असीम असे आहे, पण आपण मात्र छोटया छोटया गोष्टीतच अडकून राहिलो आहोत, अन मग त्यामुळे स्वत:ला छोटे मर्यादित समजून जगतो आहोत.

कोणी आपले कोडकौतुक केले की आपण आंनदी होतो, अन कोणी टीका केली, अपशब्द बोलले तर आपण रागावतो देखील. ही एक गुलामगिरीच नव्हे काय? म्हणजे समोरच्याच्या शब्दांमुळे मी आनंदी वा दुखी होतो! कशी आपण आपली स्थिती करून घेतली आहे पहा. मुलखाची गुलामगिरी. कधी शरीराचे गुलाम तर कधी मनाचे गुलाम, चांगल्या शब्दांचे गुलाम, अन वाईट शब्दांचे गुलाम, उत्कटतेचे गुलाम, आनंदाचे अन दु:खाचे गुलाम, जीवनाचे गुलाम, मृत्यूचे गुलाम, अन सगळ्या सर्वस्वाचेच आपण गुलाम बनून गेलो आहोत. ही गुलामगिरी मोडून काढणे अत्यंत अगत्याचे आहे आणि ते करण्यासाठी नेहमी हा विचार कर की “मी ब्रम्ह आहे.”

ज्याला खरेखरीच या शरीराच्या अन मनाच्या बंधनातून पार होऊन पुढे जायचे आहे त्याचे ध्यान या ज्ञानाच्या मार्गाचे अनुसरण करणारे हवे. “मी शरीर आहे” ही कल्पना दूर करण्यासाठी ते अत्यंत आवश्यक आहे.

शरीराचे लाड करून ते सातत्याने छान दिसेल असे का ठेवायचे? पुन्हा एकदा त्या भ्रमाचा आनंद घेण्यासाठीच ना? मग काय, ती गुलामगिरी चालूच ठेवायची का? ते काही नाही, हे सर्व बाजूला सारा. “मी शरीर नाही.” हे एकदा ठणकावून सांगा तोच ज्ञानाचा मार्ग आहे.

भक्त म्हणतो, “हे शरीर मला परमेश्वराने दिलेले आहे. हे शरीर मला हा प्रवास पूर्ण होईपर्यंत जपायला पाहीजे, जेणेकरून मी या जीवनाचा महासागर सुरक्षितपणे पार करू शकेन,” पंण योगी त्यापुढे जाऊन म्हणतो, “मी शरीराची काळजी घेणे आवश्यक आहे, जेणेकरून मी स्थिरपणे पुढे जाऊ शकेन आणि सरते शेवटी मुक्ती मिळवू शकेन.” ही मुक्तता महत्वाची!

## सर्व काही मजेशीर आहे

हे आयुष्य म्हणजे फक्त एक नाटक आहे. ते छान रंगवायचे! या नाटकाचा नटही मी अन नेपथ्यकारही मीच! आता मी भिकारी बनून या नाटकात भाग घेणार असेन, तर मग दोष दुसऱ्याला का द्यायचा? एकदा निवडली ना ही भुमिका? मग भिकाऱ्याची भुमिका चोख साकारायची, अगदी आनंदाने. कारण तुम्ही जर तुमचे खरे स्वरूप जाणले असेल, जे अनादी अनंत आहे, मी माझ्या साम्राज्याचा अनभिषिक्त सम्राट आहे. मग या आयुष्याच्या नाटकात भिकाऱ्याची भुमिका बजावली म्हणून बिघडले कोठे? हा, पण हे समजून घ्या अन मग खेळ की ! तुम्ही राजा आहात पण तरी भिकाऱ्याची भुमिका स्वीकारली आहे. मग मजा येईल. हे सारे विश्वच एक मोठा रंगमंच आहे. सारे जण हे नाटक खेळत आहेत. सगळंच चांगले आहे, हे सर्व मजेशीर आहे कारण आहे हे फक्त एक नाटय !

मी लहान असताना मला कोणीतरी सांगितले होते की देव वरून सर्व काही पाहतो आहे. मी झोपायला गेलो की छताकडे पाहत असे. मला वाटे की हे छत गायब होऊन देव आपल्याला पाहायला येणार. पण असे कधी काही घडलेच नाही. अन खरं सांगू, असे

कधी घडणार देखील नाही. आपल्या स्वत:शिवाय कोणचं आपल्याला पाहत नाही. तो पाहणारा देव आपल्या आतच बसला आहे.

म्हणून सांगतो – उगा दुखी कष्टी अन हवालदिल होऊ नका. पश्चाताप करीत बसू नका. जे झाले ते झाले. जे घडले ते सामोरे आले. आता त्याच्या परिणामांचा स्वीकार करा.

समजूतदार व्हा. सामंजस्याने तर्कशुध्द विचार करा. आपण चुका करतो, त्याचे काय एवढे मोटःए अवडंबर? सर्व काही नाटकच आहे. काही लोक त्यांच्या भूतकाळातील पापांबद्दल अन चुकांबद्दल आठवून वेडे होतात, आक्रोश करतात आणि पुन्हा पुन्हा रडतात. हे सर्व करून ते काय साधतात कोण जाणे. म्हणून सांगतो उगीचच पश्चाताप करत बसू नका. काम झाल्यावर त्याचा विचार देखील करू नका. पुढे चालत राहा ! थांबू नका ! मागे वळून पाहू नका ! मागे वळून बघून काही फायदा आहे का?

आपण मुक्त आहोत हे ज्याला उमगले आहे तोच मुक्त होतो. ज्याला वाटते की आपण बंधनात अडकलेलो आहोत तो शेवटपर्यंत बंधनातच राहतो. जीवनाचा शेवट आणि ध्येय काय आहे? काहीही नाही. कारण मला माहीत आहे की मी अनंत आहे. मग कोणते ध्येय अन कोणता शेवट?

जर तुम्ही स्वत:ला भिकारी समजाल तर तुम्ही काहीतरी मिळविण्यासाठी सतत याचना करीतच राहणार. माझे कोणतेही ध्येय नाही, इच्छा नाही, अन हेतू नाही. मी आलोय तुमच्या देशात व्याख्यान देण्यासाठी अन मनोरंजनासाठी. सर्वकाही मजेशीर आहे.

## जीवन स्तोत्र

आनंद उपभोगताना दाटली आजारपणाची भीती,
अन श्रीमंती मध्ये विचार, की राहील ही काळ किती?

मान सन्मान स्विकारल्यावर, तो टिकण्याची भ्रांती, अन
सौंदर्य आरशात न्हाहाळताना प्रश्न, टिकेल का ही कांती?

अगदी सामर्थ्यवान बनल्यावर सुध्दा, राहे हितशत्रूंची भीती,
अन विद्वानाच्या मनी सल, असतील माझ्याहून वरचढ किती?

शरीर स्वभावाला जन्मभर मृत्यूचीच दशहत,
अन आयुष्यभर दाटली फक्त भीतीच शत प्रतिशत!

आयुष्यभर क्षणाक्षणाला वाटे फक्त भीती,
कळेना का माणसाची त्यावर एवढी जडाली प्रीती?

कोणी न करी एवढी क्षिती, भीती करी अपाय,
सर्वसंगपरित्याग केवळ हाच त्यावर उपाय..
केवळ हाच त्यावर उपाय !

**('देवाच्या शोधात' या मूळ इंग्रजी कवितेचा स्वैर मराठी अनुवाद)**

# तुम्ही झाले माझी आई

**वैशाली वेदव्यास, अमेरिका.**

कृपा तुमची मजवरी
तुम्ही झाले माझी आई ॥

वास राहो तुमचा
सदैव माझे ठायी ॥

क्षण एकही नसावा
तुझ्यावीाा जीवनी ॥

अंतर चक्षुतूनी तुच दिसावा
अंतर बाह्य आणि भवनी ॥

सहस्रायुषी तुम्ही व्हावे
मोक्षास नेण्यास आम्हा ॥

जन्मदिनी तुमच्या
स्वामीचरणी हीच प्रार्थना ॥

**(गुरुजींच्या जन्मदिनी स्फुरलेली एक कविता)**





# अष्टावक्र गीता

## अध्याय ७वा

**अजित सर**

### श्लोक १

**मय्यनन्तमहाम्भोधौ विश्वपोत इतस्ततः।**
**भ्रमति स्वान्तवातेन न ममास्त्यसहिष्णुता ॥१॥**

**अर्थः** मी एक अमर्याद सागर आहे आणि त्यात विश्वाच्या लाटा त्यांच्यातील स्वाभाविक वायुमुळे इतस्ततः पसरत आहेत. मी मात्र सहिष्णु आहे (ह्या सर्वातही शांत आहे)

जेव्हा समुद्रात वारा वाढू लागतो त्यावेळेला समुद्रात उथळ पुथळ सुरू होते आणि त्यातील जहाजेही इतस्ततः पसरली जातात आणि काही वेळेला समुद्राच्या तळाशी बुडुन जातात. पण ह्या सगळ्या गोंधळाचा जराही परिणाम त्या अमर्याद समुद्रावर किंचितही होत नाही. तसेच आत्मस्वभावाच्या सत्यावस्थेमध्येही विश्व स्वतःच्या स्वभावाप्रमाणे सतत बदलत्या अवस्थेत असते. पण त्याचा अणुमात्रही परिणाम आत्मस्थितीवर होत नसतो.

### श्लोक २

**मय्यनन्तमहाम्भोधौ जगद्वीचिः स्वभावतः ।**
**उदेतु वास्तमायातु न मे वृध्दिर्न च क्षतिः ॥२॥**

**अर्थः** माझ्या अमर्याद अस्तित्वामध्ये संसाराच्या लाटा उमटत असतात किंवा नष्ट पावत असतात. पण त्यामुळे मी कधी कमी होत नाही ना मी कधी वाढत.

समुद्राच्या पाण्यातील लाट म्हणजे त्या समुद्रातील पाणीच असते. फक्त त्या पाण्याला नाम आणि रूप प्राप्त होते एवढेच. खरे म्हणजे त्यात काहीच वाढलेले नसते आणि कमीही झालेले नसते आणि स्वाभाविकच समुद्राचा आकारमान आणि वजन काहीच वाढत अथवा कमी होत नसतात. तसेच विश्वाचे असते. नाम-रुपाने फक्त त्या सत्यावर त्यांचा आभास तयार होत असतो. त्या लाटा जेव्हा विरून जातात तेव्हा फक्त नाम आणि रूप विरून जातात. सत्य तसेच अबाधित राहत असते.

## श्लोक ३:

**मय्यनन्तमहाम्भोधौ विश्वं नाम विकल्पना ।**
**अतिशान्तो निराकार एतदेवाहमास्थितः ॥३॥**

**अर्थः** माझ्या अमर्याद अस्तित्वात विश्वाची फक्त प्रतिमा दिसत असते. मी निरूप आणि शांत आहे. ह्यातच माझा निवास असतो.

वरील उदाहरणामध्ये समुद्र आणि त्याच्या लाटा यांच्यामध्ये अजूनही भेद आहे आणि थोडे का होईना द्वैत आहे. येथे जनकाला वाटते कि शेवटी लाटाही समुद्रात विलीन होतात म्हणजे अजूनही द्वैत आहे. परंतु मी शिंपली आहे त्याला चांदी समजणे हा तर पूर्ण आभास आहे. म्हणूनच ना त्याचा त्याग आहे, ना स्वीकार आणि ना विनाश.

## श्लोक ४:

**नात्मा भावेषु नो भावस्तत्रानन्ते निरन्जने ।**
**इत्यसक्तोऽस्पृहः शान्त एतदेवाहमास्थितः ॥४॥**

**अर्थः** आत्मा ही काही वस्तु नव्हे. आणि वस्तु ही काही आत्मा नव्हे जो अमर्याद आणि निष्कलंक आहे. त्यामुळेच तो आत्मा सर्व नात्यांपासून आणि वासनांपासून मुक्तच असतो. तो शांत असतो आणि त्यातच माझा निवास असतो.

आत्मा हा सर्वव्यापी आणि अमर्याद आहे. देह आणि मनासारख्या सीमित पदार्थांमध्ये तो मावूच शकत नाही. ह्या पदार्थांना सुद्धा त्या आत्म्याच्या बाह्य आवरणावरील प्रतिमा असल्याने आत्म्याच्या आत राहणे शक्य नसते.

## श्लोक ५

**अषे चिन्मात्रमेवाहमिन्द्रजालोपमं जगत् ।**
**अतो मम कथं कुत्र हेयोपादेयकल्पना ॥५॥**

**अर्थः** मी खरोखर एक आत्मा आहे. विश्व तर मायेचे इंद्रजाल आहे. मग स्विकार किंवा अस्विकार यांचा संबंधच कोठे आला?

आत्मज्ञानाला प्राप्त झालेल्या पुरुषाला हे विश्व म्हणजे एका जादुगाराचा आभास हे कळते. मग काही गोष्टींचा स्विकार आणि काही गोष्टींचा अस्विकार कसा काय करता येईल. सगळाच जर आभास आहे मग काय निवडायचे आणि काय वगळायचे?



(भाग २)

# देमो दूक – ले लदाख (खूप सुंदर लदाख)

यामिनी कुटुंबळे (वडोदरा).

## दिवस ४ : मनाली ते सरचू

मला असे वाटते की माझा खरा प्रवास चवथ्या दिवसापासून सुरु झाला, जेव्हा आम्ही हिमालयातून आमचे पुढील गंतव्य 'सरचू' पर्यंत प्रवास केला. जे 'जुना रेशीम मार्ग' म्हणूनही ओळखले जाते. हा लदाखचा ओसाड प्रदेश आहे. मनालीहून सरचू ला जाताना आम्हाला 'बारा–लाचा' पास लागला. निसर्गाच्या दोन खुप वेगळ्या स्वरूपांच्या मधील सीमा. बारा–लाचा च्या आधी निसर्ग हिरवा आणि उबदार होता. जणू देवी पार्वतीच्या शालीन, मोहक रुपाने बहरलेला आल्हादक निसर्ग. 'बारा–लाचा' नंतर निसर्ग पांढराशुभ्र आणि पर्वत बर्फाच्छदित होते. तिथे शांतता होती– फक्त शांतता. तिथे मला 'कर्पूर गौरं करूणावतारम' ची आठवण झाली.

अंदाजे १५००० फूट उंचीवरील 'चंद्र' आणि 'भागा' या दोन नद्या प्रवासात आमच्या साथीला होत्या. सरचू पर्यंतचा आमचा प्रवास वाटला तेवढा रेशमी नव्हता. अर्धा प्रवास झाल्यावर एका जागी भूस्खलन झाल्यामुळे आम्हाला थांबावे लागले. दगड रस्त्यावर पसरले होते आणि दगडांवरून पाणी वाहत होते. ट्रक आणि ट्रॉली सहित सर्व वाहने रस्त्यात अडकली होती. कुठलीच वाहने रस्ता ओलांडू शकत नव्हती. पुन्हा अनिश्चितता. आम्हि थोडा वेळ वाट पाहीली पन प्रयत्नांना यश मिळण्यासाठी महत्वाच्या तीन घटकांची मला आठवण आली.



Figure: Barrens of Sarchu

रेकिची दुसरी श्रेणी झाल्यामुळे मी लगेच 'दैवा'कडून मदत मिळवण्यासाठी 'वेळ' पारखून 'प्रयत्न' चालू केले. मी संकल्पासह रेकि सुरु केली की येथे उपस्थित असलेल्या सर्वांनी ३० मिनीटांच्या आत रस्ता ओलांडला आहे. आमच्यावर कृपा झाली आणि दूरवर नजर ठेवून सुध्दा न दिसणारे वाहन अचानक दृष्टीक्षेपात आले. ड्रायव्हरने सांगितले की त्याला कोणीही कळवले नव्हते पण तिथे तो आम्हा सर्वांच्या मदतीसाठी स्वत:हून धावून आला. दगडांना समतल करून मार्ग तयार करण्यासाठी तो एकटाच प्रयत्नशील होता. अशा प्रकारे आम्ही पुन्हा दैव चे आभार मानून सरचूचा प्रवास सुरु केला. प्रवासा दरम्यान आम्ही अटल बोगद्यातून गेलो, सोलंग व्हॅली देखील पाहीली. अस्सल हिमालय ढाब्यावर दुपारी जेवलो. कॅम्पसाईटला पोचल्यावर आम्ही 'मुल्कीला कॅम्प एडव्हेंचर' येथे उतरलो. राष्ट्रीय महामार्ग क्रं ३ वर असलेल्या, मनाली ते सरचू मार्गावरील सर्वात उंच दोन पासच्या मध्ये सर्व प्रवाशांचे हे सर्वात आवडते ठिकाण आहे. मागे निसर्गरम्य पर्वत आणि समोर दऱ्या असलेल्या जागी आम्ही ताज्या तयार केलेल्या गरम 'केहवा' सह संध्याकाळी जाणवणाऱ्या गारठयाचा आनंद घेतला. रात्रीचे जेवण आणि आरामदायक तंबूत गप्पा मारल्यानंतर आम्ही आमचा दिवस संपवला.

Figure: Mulkila Adventure Camp



## दिवस ५ : सरचू ते लेह

आम्ही राजधानी लेहला जाण्यासाठी तयार झालो. लद्दाखच्या ओसाड आणि थंड वातावरणाने आमचे उष्मापूर्ण स्वागत केले. सुसाट वेगाने वारे वाहत होते पण आम्हाला त्याची भीती वाटली नाही. हिमालयाच्या 'झांस्कर (कॉपर वॅली)' पर्वतरांगेतून आम्ही उत्तरेकडे आमचा पुढचा प्रवास सुरु केला. जसजसे आम्ही उंची गाठत होतो, तसतसे आम्हाला आमचा ताण आणि रोजच्या जीवनातून मुक्तता मिळाल्यासारखे वाटत होते. आता आम्हाला 'नकीला पास' पर्यंत पोहोचायचे होते, जो पर्वतावरील सर्वात उंच पास आहे. १५००० फूट वर असलेल्या या '२१ गाटा' (घाटावर) नाव असलेल्या पास वर चढताना आकडयासारखी २१ वळणे आहेत. हा रस्ता येथे दफन केलेल्या प्रवाशाच्या भूताने पछाडलेला असल्याचे म्हटले जाते. सुदैवाने आम्ही तो रस्ता सुरक्षितपणे पार करू शकलो. 'नकीला पास' ओलांडल्यावर आम्ही व्हिस्की नाल्याजवळ डोंगरावरून वाहणाऱ्या शुध्द पाण्याच्या प्रवाहाचा आनंद घेण्यासाठी थोडावेळ थांबलो. पुढचे स्थान होते 'लाचु लुंग ला'. १६००० फूट उंचीवर असणाऱ्या पर्वतरांगांच्या विविध छटांचा आनंद घेण्यासाठी हा सर्वात सोपा पास आहे. इथे आमचा गोंधळा झाला की आमचा श्वास उंचीवर गेल्यामुळे रोखला आहे की हिमालयाला पाहून?

लेहला जाताना १७००० फुटांहून अधिक उंचीवर असणारा 'तांग-लंग ला' हा शेवटला पास आहे. ह्या पास ला बधून तुम्हाला असे वाटते की तुम्ही वेगळ्याच विश्वात आहात आणि त्याचे सौंदर्य मनावर कायमचा ठसा निर्माण करते. हा पास खडकाळ पर्वतांमधून निर्माण केलेला आहे. जो संथ वाहणाऱ्या पाण्याच्या झऱ्यांमधून वळणे घेत जातो. थोडया अंतरावरून आपण बर्फाच्छादित शिखरे पाहू शकतो.

मला हिमालयाएवढे तरूण झाल्यासारखे वाटत होते. बर्फाबद्दल माहित नाही पणा मी निसर्गातील वैविध्यतेची अनुभूती घेताना त्यात ओघळले.

क्रमश:

**Figure: "21 Gata Loops"**



# रेकि हिलींग.. माझा अनुभव..



एश्वर्या प्रभू, पुणे.

मी शाळेत होते तेव्हा पासून रेकि हिलींग बद्दल ऐकून होते. रेकि ही एक जपानी हिलींग पध्दती आहे इतकेच ऐकून होते आणि बरेच लोकांना त्याचा फायदा होतो हे ही माहीत होते.

अनेकदा मनात विचार येऊन गेला की रेकि शिकावी पण मनाला भिडेल अस गुरु मिळत नव्हता. शिकवणारे अनेक होते पण तिथे मूळ उद्देश अध्यात्मिक प्रगती नसून रेकि बिझनेस हा वाटायचा. शेवटी रेकि शिकण्याचा नाद मी सोडून दिला पण मनात मात्र ती इच्छा तशीच राहिली होती.

माझ्या गुरुंकडून एक वाक्य कायम ऐकले होते की गुरू तेव्हाच मिळतो जेव्हा आपले पात्र स्वच्छ असते आणि त्या गुरुची दिक्षा स्वीकारण्यासाठी शिष्य सगळ्या बाबतीत तयार .

गेल्या महीन्यात अचानक आईकडून एक संस्था कळली जिथे रेकिचे वर्ग होतात आणि एक अध्यात्मिक जोड आहे असेही कळले. ह्यावेळी मनात कुठलाच किंतु परंतु आला नाही आणि थेट रेकिची पहीली पायरी चढले. खुप आन गुरु, खुप अध्यात्मिक वातावरण, मन प्रसन्न करणारे संस्कार आणि वातावरण ह्यात रेकि प्रथम लेव्हल पार झाली. रोजची साधना आणि स्वामींमार्फत माझ्याकडून जी लोकसेवा होत आहे त्याचे अनुभव तर रोज येत आहेत व खुप समाधान मिळत आहे.

आयुष्यात पैशाने सुख सोयी नक्कीच मिळवता येतात पण आत्मिक समाधान कसे मिळवावे ह्याची रेकि ही गुरुकिल्ली आहे हे मात्र नक्की.

(रेकि विद्या निकेतनच्या पुणे येथील नुकत्याच झालेल्या शिबीरातील साधिकेचा अनुभव)

# कथा दोन फांद्यांची

गंगोत्रीला उगम पावलेली पवित्र गंगा नदी आता ऋषिकेशच्या भूमितून शांतपणे वाहत वाहत हरिद्वारच्या संतभूमित उत्साहाने सळसळून वाहू लागते हे आपणाला माहीतच आहे. हरिद्वारच्या हरकी पौडीमध्ये तिच्या किनाऱ्यावर असलेल्या एका झाडाच्या दोन फांद्या गंगेच्या प्रवाहात पडल्या आणि नदीच्या पाण्याबरोबर पुढे वाहू लागल्या. त्या फांद्यांतील एक फांदी आडवी होऊन नदीच्या प्रवाहाला अडवण्याचा केविलवाणा प्रयत्न करू लागली. दुसरी फांदी मात्र नदीच्या पात्राच्या प्रवाहाबरोबर विहरत वाहू लागली.

बरेच अंतर लोटल्यानंतर त्या आडव्या जाणाऱ्या फांदीच्या लक्षात आले कि आपला जीव घाबरतोय, घुसमटतोय. आपण एवढा जीवाचा आटापीटा करून सुद्धा नदी आपल्याला फरफटत पुढे नेत आहे. दुसरी फांदी मात्र संथपणे आनंदाने नदीबरोबर काठावरचे सौंदर्य न्याहाळत मजेत पुढे जात आहे. पहिल्या फंदीला ह्याचा राग आला आणि ती दुसऱ्या फांदीला म्हणाली, "अग, असे गुणगुणत आनंदाने पुढे जायला तुला लाज वाटत नाही? अग ही नदी आपल्याला आपल्या इच्छेविरूद्ध फरफटत नेत आहे. हे बघ मी प्रतिकार करते आहे आणि करत राहणार, भले काहीही होऊ दे." दुसरी फांदी शांतपणे म्हणाली, "हे बघ, ह्या पवित्र नदीचा प्रवाह जोरदार आहे आणि त्या प्रवाहाला थांबवणे कठीण आहे. ती काही आपल्याला इच्छेविरूद्ध फरफटत वगैरे नेत आहे असे मला नाही वाटत. मला तर खूप मजा येते आहे. मग संघर्ष कशाला करायचा? काहीही केल्याशिवाय आपल्याला ही नदी त्या अफाट समुद्राकडे नेणार. मग त्याला विरोध का करायचा? अग, हे आपल्याच हिताचे आहे. हे समज. बघ, तू आडवी आहेस ना तर थोडीशी दिशा बदल अणि माझ्यासारखी नदीच्या प्रवाहाला समांतर हो. बघ मग कशी मजा येते ते. हे बघ, आपण कसेही वाहायलो तरीही तू आणि मी एकाच वेळेला त्या समुद्रात जाणार. प्रश्न फक्त ह्या प्रवासात आपले अनुभव कसे असणार तोच. मी आनंदाने, आयुष्याचा उत्सव करत समुद्राच्या मिठीत शिरणार आणि तू मात्र मुसमुसत तो स्वत:चा पराभव मानत नियतिला दोष देत त्याच्या कुशीत शिरणार. अग थोडेसे बदललो ना आपण तर जीवन कसे सुरळीत होते. बदलायला शिक ग."

**तात्पर्य: अपण गेल्याच अंकात पाह्यले कि परमेश्वरी अतिमानसी चैतन्याचा प्रवाह आपल्याला पुकारतो आहे आणि त्या नव चैतन्याला आपण सामोरे गेलो कि एका मोठया शक्तीचा अनुभव करत जीवनाचा महोत्सव आपण करत असतो.**



# कभी नही देखे ऐसे गुरूवर..

सौ. वंदना तेलंग, ठाणे

## आकाश आणि वृक्ष - आदर्श गुरू आणि शिष्य



स्वामी समर्थांवरच्या एका मालिकेत नुकताच एक प्रसंग दाखविला गेला. आपला शिष्य बाळाप्पा याच्याबरोबर उभे असताना स्वामी अचानक एका वृक्षाला मिठी मारतात. त्यांना त्या वृक्षाबद्दल प्रचंड प्रेम वाटत असते. ते बाळाप्पांना सांगतात कि हे वृक्ष सर्वांवरच प्रेम करत असतात निरपेक्षपणे. त्यांचे प्रेम शुद्ध असते. ते खरे म्हणजे सर्वांनाच आपल्या आयुष्यात सामावून घेत असतात. एखाद्या संताकडे असणारे दया, क्षमा, शांति, आर्जव, सत्य हे गुण निसर्गत:च ह्या वृक्षांकडे असतात. वृक्षाचा प्रत्येक भाग जगाच्या कामाला येत असतो. कोणी त्याला तोडायचा प्रयत्न केला तरीही तो त्या माणसालाही फळे, फुले देतो, त्याला आपली छाया नाकारत नाही. जाळायला निघालेल्या माणसालाही तो जळणाचे लाकूड पुरवतो. स्वामी बाळाप्पांना विचारतात कि हे सगळे गुण कोठून येतात झाडाकडे? तो हे सगळे त्या विशाल आकाशातून शिकत असतो. ते सर्वव्यापि आकाश हेच त्याचे गुरू आहेत. आकाशाखाली नुसते जरी उभे राहीले तरीही ते सगळ्यांना निरामय बनवत असते. वृक्ष हा त्याचा आवडता शिष्य आहे. त्याला ते आकाश सातत्याने आपल्याकडे बोलावत असते. त्याच्या वाटेकडे डोळे लावून राह्यलेले असते. आणि तो वृक्षही आपल्या असंख्य हातांनी आकाशाला कवटाळत असतो. तो आकाश गुरू मग कधी आपल्या शिष्याला वाऱ्या वादळांचा अनुभव देत समर्थ बनवत असतो तर कधी आपल्या आशिर्वादांच्या पावसाखाली चिंब भिजवून टाकत असतो. सगळ्या जगाच्या स्विकाराला तो आपल्या शिष्याला तयार करतो. सामर्थ्याने लगडलेल्या वृक्षाला तो अहंकाराचा त्याग करून नम्रतेने झुकायला लावतो. आणि म्हणूनच मग तो वृक्ष व्यवहाराच्या भूमीत आपली मूळे असूनही आकाशाकडे आकर्षित होत राहतो. आकाशाची उंची गाठायचा प्रयत्न करत राहतो आणि एक दिवस आपल्यातील अग्नि तत्वाला जागते करून आकाश तत्वाशी समरूप होतो.



# ज्ञानेश्वर
## एक रंगकर्मी
(भाग २)

**श्री देवदत्त जोशी, पुणे**

ज्ञानेश्वरी सांगताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "अतींद्रिय परी भोगवीन इंद्रीयांकरवी". लेखक याला नव्या धर्मक्रांतीची मुहूर्तमेढ मानतात. अध्यात्म हे निरस नसून ते कलात्मक रुपाने देखील घेता येते, अन जे इंद्रियांपलीकडे आहे ते म्हणूनच सामान्य माणसासाठी इंद्रियांच्या कक्षेत आणता येते. ही साधी सुधी गोष्ट नाही. यासाठी सांगणाऱ्याची योग्यता केवढी मोठी हवी! सामान्यांना कलाविष्काराच्या अभिव्यक्तीने अध्यात्म, ते देखील भगवान कृष्णाने अर्जुनाला रणांगणावर सांगितलेले ते सांगणे हे ज्ञानेश्वरीचे एक विलक्षण आकर्षण आहे असे लेखक सांगतात.

आता अशी अभिजात कलाकृती सादर करताना ज्ञानेश्वर महाराज श्रोत्यांना आवाहन करतात की अगदी लक्षपूर्वक ऐका. नव्हे अनुभव घ्या, त्यासाठी अगदी ध्यानच लावा हवे तर. म्हणजे मग हे "अरुप रुपात प्रकट केलेले तुम्हाला दिसेल. अन ध्वनीचे रंग देखील दिसतील." कृष्णाने अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली त्याचे विश्वरुप दर्शन पाहता यावे म्हणून, अन इकडे ज्ञानेश्वर महाराज एकाच वेळी अनेकांना ही दृष्टी देता आहेत.

ज्ञानेश्वर महाराजांच्या अगोदर कितीतरी लोकांनी गीतेवर मोठं मोठाली भाष्ये लिहिली अन सांगितली आहेत. पण ज्ञानेश्वरी भाष्य नव्हे तर भावार्थ आहे असे लेखक सांगतात. अन तो इतका अप्रतिम आहे, अनोखा आहे, नव्हे गीतेच्याच तोडीचा आहे, म्हणून ज्ञानेश्वर महाराज गीता अन ज्ञानेश्वरीची तुलना करताना म्हणतात की सांगा यापैकी अंग कोणते अन दागिना कोणता? कोणी कोणाची शोभा वाढवली? लेखकाला ज्ञानेश्वर महाराजांचा हा आत्मविश्वास अन धाडस विलक्षण भावले आहे, नव्हे त्यांनी स्वत: ज्ञानेश्वरीचे वर्षानुवर्षे वाचन, पठण अन मनन केल्याने लेखकाला ज्ञानेश्वर महाराजांचे हे म्हणणे तंतोतंत पटले आहे. त्यांच्या लिखाणातून याची वारंवार प्रचिती येते.

पारंपारीक अध्यात्म म्हणजे एक रुक्ष विषय संसाराचा धिक्कार अन वैराग्य अशी सर्वसामान्यांची समजूत बदलून टाकण्यासाठीच ज्ञानेश्वर महाराज कलाविष्काराच्या अन कथेच्या माध्यमातून ज्ञानेश्वरीत गीतेची मांडणी करतात. "अध्यात्म सर्वांसाठी, सामान्य जनांसाठी" अशी ती भूमिका आहे. अध्यात्म प्रपंचातून सुटण्यासाठी वा पळून जाण्यासाठी नाही तर रसिकतेने जीवनाकडे पाहण्यासाठी आहे, असा नवा दृष्टीकोन ज्ञानेश्वर महाराज मांडत आहेत असे लेखकाला वाटते. तिथे अगडबंब विद्वत्ता नाही अन अन रुक्षता तर अजिबात नाही. तिथे आहे रसिकता, तिथे आहे नाटय, तिथे आहे कला, तिथे आहे एक अभिजात अनुभव. अन तरी देखील तिथे आहे ज्ञानाचे भांडार. मनोरंजनाच्या माध्यमाचा वापर करून मनातील वाईट विचारांचे भंजन. त्यामुळेच गीतेवर अवघड अन अवजड प्रवचन ऐकावी लागणार या समजेलाच धक्का देण्यात आलेला आहे.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ गीतेवरचा भावार्थ असल्याने त्याला भाषांतराची बंधने येत नाहीत. शब्दांची अडचण होत नाही. अन काय अन किती ठेवायचे वा वगळायचे, का त्याचा अधिक विस्तार करायचा याचा निर्णय देखील त्यामुळं अर्थातच ज्ञानेश्वर महाराज स्वत:च करू शकतात, असे लेखक म्हणतो. म्हणजे आधी नुसती कथा ते सांगतात नंतर भक्ताची कथा सांगतात अन नंतर भक्ताच्या गुणांची कथा सांगतात. परमार्थाला एकदम धाडकन हात घालत नाहीत पण योग्य तो संदेश मात्र नेमका सामान्यांना, त्यांच्या शब्दात अन रसिकतेच्या मुलाम्यात बेमालूम गुंडाळतात. असे लेखक म्हणतो. कथेने सुरुवात करून शेवटच्या अध्यायात पसायदान म्हणजे सद्गुणांचा प्रसाद ज्ञानेश्वर महाराज मागतात. लोकांच्या मनातील दुर्गुण नाहीसे होऊ देत अन सत्कर्माची आवड वाढू देत, परस्पर सहकार्य अन मैत्री भाव राहू देत असे मागणे ते वैश्विक देवाकडे मागतात.

वैदिक धर्माची परंपरा चार पुरुषार्थांची – धर्म, अर्थ, काम अन मोक्ष लेखक म्हणतो की ज्ञानेश्वर महाराज त्यात भक्ती मार्ग असा पाचवा पुरुषार्थ आहे असे सांगतात. स्वत:ला मोक्ष मिळाला म्हणजे झाले असे नाही तर आजूबाजूंच्या लोकांना,

समाजालाही मिळायला हवा त्यांनाही या आनंदोत्सवात सामील करायला हवे हे सांगणे, त्या काळाचा विचार करता अपारंपारिक अन क्रांतिकारक आहे. हाच खरा ज्ञानेश्वरीचा प्रतिपाद्य विषय असे लेखक म्हणतो.

ज्ञानेश्वरांच्या या कलाविष्काराचे वर्णन करताना लेखक म्हणतो "ॐ नमोजी आद्या ही या नाटकाची नांदी, तोषोनि द्यावे पसायदान हे भरतवाक्य आणि त्यांच्या मधे मधे ज्ञानेश्वर या अस्सल रंगकर्मीने आपले नाटक ओभे केले आहे." आनंद ही खास भारतीय संस्कृती अन नाटक त्याचा गमक ज्ञानेश्वर महाराज हे सारे ज्ञान मूठभर अंतरंग साधकांसाठी बोलत नसून बहुजनांसाठी बोलतात याची अखंड जाणीव ज्ञानेश्वरी वाचताना होते.

महाभारतातल्या गीता प्रसंगात नाट्य मुळातच भारलेले आहे, हे ज्ञानेश्वर महाराज ओळखतात. पण त्याची रंगत ते अधिकच वाढवितात. या मूळ नाटकात कृष्ण अन अर्जुन ही दोन मुख्य पात्रे तर संजय अन धृतराष्ट्र ही दोन गौण पात्रे आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत ही पात्रसंख्या पुष्कळ वाढविली आहे. नेवासेकर मंडळी, गुरु निवृत्तीनाथ, स्वतः ज्ञानेश्वर महाराज अशी पदराची भर घालून संवादही वाढविले आहेत, मूळ गीतेतल्या संवादापेक्षा कितीतरी जास्त संवाद कृष्णअर्जुन हा अल्लड, उतावळा, भाबडा, देवाशी सलगी करणारा, देवावर रुसणारा, फुगणारा अन प्रसंगी आडमुठे धोरण स्वीकारणारा असा रंगविला आहे, तर कृष्ण ज्ञानी, धीरोदात्त, प्रसंगी मिश्किल देखील दाखविला आहे. संजय स्वतःला भाग्यवान समजणारा दाखविला आहे तर धृतराष्ट्र म्हातारा, थेरडा, हतबल खडूस असा रंगविला आहे. ज्ञानेश्वरीत निवृत्ती महाराज अन श्रोते देखील काही वेळा बोलतात. मूळ गीतेत हस्तिनापुरात संजय धृतराष्ट्र अन कुरुक्षेत्रात कृष्ण अर्जुन बोलतात, पण ज्ञानेश्वरीत दुर्योधन देखील मधेच तरातरा येऊन टपकतो, काही फुशारकी मारतो, अन मिशांना पीळ देऊन निघून जातो. श्रोते वर्ग पोट धरून हसतात. हेच ते नाट्य असे लेखक म्हणतो.

शुध्द नाट्यतंत्राच्या दृष्टीने गीतेत वस्तुतः तीनच प्रसंग आहेत –

१. पहिल्या अध्यायात माझे हात पाय थरथरत आहेत, घशाला कोरड पडली आहे, मी काही त्यांना मारणार नाही, त्यांनीच मला मारले तरी बेहत्तर असे अर्जुन म्हणतो. धनुष्य बाण टाकून देऊन रथात जाऊन बसतो.

२. कृष्ण परोपरीने सांगतो, पण उपयोग होत नाही म्हणून मग ११ व्या अध्यायात त्याला विश्वरूप दर्शन दाखवितो.

३. अठराव्या अध्यायात अर्जुन ताळ्यावर येतो अन युध्दाला तयार होतो.

गीतेतील मूळ नाट्य एवढेच. या तीन नाट्य प्रसंगांना ज्ञानेश्वर महाराज स्वतःची अशी खास ट्रीटमेंट देतात ती लेखकाला फारच भावली आहे.

मूळ गीतेत अर्जुन रथात नुसताच बसून राहतो. शांतपणे. पण ज्ञानेश्वर महाराजांनी त्याला रथातून उडी घ्यायला लावली आहे, तीही जंगी उडी ! अर्जुनाने रथातून खाली उडी घेतली हा १ ल्या अध्यायातील नाट्यमय धागा ११ व्या अध्यायात ज्ञानेश्वर महाराज असा काही बेमालूमपणे जोडतात की बस !

विश्वरूपाचा काहीसा भयंकर प्रसंग पार पडतो, अर्जुनाला हायसे वाटू लागते, तो सावश होतो, आवंढा गिळून भानावर येतो अन त्याला पुन्हा दिसते – तेच कुरुक्षेत्र, तेच रणांगण, तोच कृष्ण वरती रथात अन अर्जुनराव जमिनीवर मातित – हा फ्लॅशबॅक ज्ञानेश्वर महाराजांनी खास रंगविला जो मूळ गीतेत नाही.

शेवटच्या तिसऱ्या प्रसंगात अर्जुन कृष्णाला म्हणतो नतमस्तक होऊन की तू मला सांगशील तसे करेन. इथे ॲक्शन काहीच नाही आणि कृष्णालाही स्वस्थ बसण्याखेरीज बिझनेस नाही. पण ज्ञानेश्वर महाराज आपल्या नाट्यात चटकदार ट्विस्ट हवा म्हणून आता कृष्णाला आनंदाने रथातून उडी घ्यायला लावतात, नेवासेकर मंडळी आनंदाने टाळ्या वाजवितात अन डोलू लागतात, विठ्ठल... विठ्ठल... !

सर्व ज्ञानेश्वरी भक्तांची अन अभ्यासकांची ठाम समजूत अशी की हजारो वर्षांपासून चालत आलेल्या वैदिक धर्माची री ज्ञानेश्वरी महाराजांनी ओढली आहे. पण हे सपशेल चुकीचे आहे, असे लेखक ठामपणे सांगतो. मोक्ष म्हणजे संसारातून सुटण्याची, निसटण्याची पलायनवादी भूमिका त्यांनी उडवून लावली व ईश्वरार्पण बुध्दीने सर्व कर्म करीत रहा, असा अभूतपूर्व संदेश जगाला दिला. सारे जीवनचं एक उत्सव बनवा असे त्यांनी बजावून सांगितले आहे. ज्ञानेश्वरी हा स्वतंत्र दर्शनग्रंथ म्हणून अभ्यासाला न जाता फक्त गीतेचे विवरण म्हणून अभ्यासाला गेला आहे अशी लेखकाला खंत वाटते. गीता संपूर्ण बाजूला ठेवूनच ज्ञानेश्वरी वाचायला हवी, अगदी निर्मळ मनाने म्हणजे पारंपारिक प्रस्थापित धर्मकल्पनेपासून कशी भिन्न तरीही शाश्वत सनातन विश्वधर्माशी सुसंगत आहे हे सर्वांच्या लक्षात येईल, असे देखील लेखक सांगतो. अन हे गाढे अध्यात्म ज्ञानेश्वर महाराज कथेच्या, भजनाच्या अन नाटकाच्या माध्यमातून सांगतात.

ज्ञानेश्वर महाराज सूत्रधारासारखे अखंड या नाटकात दिसतात. सूत्रधार हा खास नाट्यछटेचा भाग, तो नाटकात असून नसल्यासारखा अन नसून असल्यासारखा. नाटकात नसतात तेव्हा ते प्रेक्षकात असतात अन प्रेक्षकात नसतात तेव्हा नाटकात असतात. ज्ञानेश्वर महाराज हे सर्व फारच उत्तमरीतीने करतात. ज्ञानेश्वरांचे ते गोड बोलणे, मधाळ शब्दांचे कोंदण, ज्ञानाची बरसात अन नाटकाची त्याला साथ, हे एका रंगकर्मीचे काम नाही तर कोणाचे? असा सवाल लेखक पुस्तकात विचारतात अन या प्रतिभावान अन ज्ञानसंपन्न ऋषी पुढे त्रिवार साष्टांग घालून शेवटी म्हणतात, "मनम नटवरा, विस्मय करा ॥"

# आश्रम वार्ता

## (१) देवरूख आश्रमातील श्री दत्त जयंति उत्सव:

मार्गशीर्ष महिन्यातील येणाऱ्या पौर्णिमेला साजऱ्या होणाऱ्या दत्त जयंतिचा उत्सव म्हणजे देवरूख आश्रमाशी जोडलेल्या साधकांना मोठी पर्वणीच जणू. या वर्षी दत्त जयंति १८ डिसेंबरला आली. परंतु देवरूख आश्रमात उत्सवाची सुरूवात मात्र १६ तारखेलाच झाली. आणि हा उत्सव नानाविध रंगीबेरंगी कार्यक्रमांनी सजून १८ तारखेपर्यंत चालला. १६ला सुरू झालेला दत्तयाग त्यानंतर २ दिवस सूर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत चालूच राहीला. १७ तारखेची सत्यदत्ताची पूजा, १८ची पूर्णाहुति, सर्व संध्याकाळी चालणाऱ्या संगित मैफीली अशी कार्यक्रमांची धूमधाम चालू होती. कोविड च्या महामारीमुळे सरकारी धोरणाप्रमाणे मठात फक्त ५० साधकच राहू शकत होते. परंतु देवरूख गावातील स्थानिक साधक येऊन जाऊन मोठया उत्साहाने या सोहळ्यास उपस्थित राहील्याने दरवर्षीप्रमाणेच मठातले वातावरण दत्त भक्तीने भारावलेलेच होते. आपले साधक श्री अवधूत पोटफोडे आणि त्यांच्या चमूने स्वामींसाठी गुहेची पार्श्वभूमि तयार केली होती ती अवर्णनीय होती व ज्यांनी त्याचा प्रत्यक्ष अनुभव केला त्यांनी स्वामींच्या प्रकट होण्याची अनुभूति घेतली असेल.






## (२) ऑनलाईन अनघाष्टमी पूजन:




अनघाष्टमी पूजन




२७ डिसेंबरला आपल्या मठाने मार्गशीर्ष महिन्यातील बहुला अष्टमीचा मुहुर्त साधून ऑनलाईन अनघाष्टमी जागतिक पातळीवर करण्याचा संकल्प केला. हा मठाचा इतिहासातील एक मोठा मैलाचा दगड मानायला हरकत नाही. जगभराच्या १०८ साधकांनी /दत्त भक्तांनी त्यात भाग घेतला. भारतिय उपासकांसाठी सकाळचे सत्र तर अमेरिकेतील वेळ साधण्यासाठी त्यांच्यासाठी संध्याकाळचे सत्र अश्या दोन सत्रात देवरूख मठातून अनघाष्टमीच्या पूजेचे प्रसारणच नव्हे तर उपासकांकडून १०८ घरांमध्ये पूजा करवून घेण्यात आल्या. वर्षभरासाठी चालणाऱ्या ह्या संकल्पातील हे पहिले पुष्प होते. गुरूजींच्या, देवरूखात मंदिर व्यवस्थापन शिक्षण संस्था काढण्याच्या स्वप्नाचे हे पहिले पाऊल आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# आश्रम वार्ता

## (३) डि.एस. पी.पी. एल. तर्फे सामाजिक समर्थता कार्यक्रम:

डि.एस. पी.पी.एल. ह्या आपल्या परिवारातील साधक संस्थेने २०२२ साली नव्या पिढीसाठी सामाजिक जागरणाचा विडा उचलला आहे. त्यातील एक भाग म्हणून संस्थेतर्फे दर पंधरवडयाला एका माननीय वक्त्याला आमंत्रित केले जाते. नव चंद्र (न्यू मून) आणि पूर्ण चंद्र (फुल मून) अशी दोन सत्रे दर महिन्याला घेण्याचे संस्थेने ठरविले त्यातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या नव चंद्र सत्रात सौ. आदिती नातू ह्या शिक्षणक्षेत्रातील मान्यवर शिक्षिकेचे व्याख्यान दिनांक ४ डिसेंबरला ठेवले गेले तर पूर्ण चंद्र सत्रात विख्यात शिक्षणतज्ञ आणि अनुभूति संस्थेचे संस्थापक श्री समीर खाडये यांचे व्याख्यान दिनांक १९ डिसेंबरला ठेवले गेले. ह्या दोनही कार्यक्रमांना अतिशय छान प्रतिसाद मिळाला. २०२२ सालात अशी सत्रे आता वर्षभर चालतिल.






## (४) आयुष्मान भारत डॉक्टरांसाठी नवा उपक्रम:

रेकि विद्या निकेतनतर्फे भारत सरकारच्या विद्यमाने चालू असलेल्या आयुष्मान भारत योजने अंतर्गत गुजरातमधील डॉक्टरांसाठी रेकिची शिबिरे आता गेली दोन वर्षे चालली आहेत. ह्या डॉक्टरांसाठी दर पंधरा दिवसांनी गुरूजींचे मार्गदर्शन मिळावे म्हणून रेकि विद्या निकेतन उपचार क्षेत्रातील वेगबेगळ्या विषयांवर ऑनलाईन शिबिरे भरवत असते. त्यातील दोन सत्रे दिनांक २२ व २३ डिसेंबरच्या संध्याकाळी आयोजित केली होती. योगनिद्रेचा उपचारातील उपयोग आणि मानवी आयुष्यात होणारी चैतन्याची स्थित्यंतरे आणि त्याची उपचार पद्धतिसाठी लागणारी समज असे दोन विषय गुरूजींनी डॉक्टरांना विषद करून सांगितले. ह्या योजनेखाली आतापर्यंत ६०० डॉक्टरांनी रेकिचे प्रशिक्षण घेतले आहे.

## (५) राजकोट केंद्राने सुरू केले रेकि आरोग्य मंदिर:

रेकि विद्या निकेतनच्या राजकोट केंद्रातील साधक समूहाने आता राजकोटमध्येही रेकि आरोग्य मंदिर (राम) सुरू करण्याचे ठरविले व २५ डिसेंबरपासून ते चालूही केले. सामान्य आणि गरीब रूग्णांना रेकि उपचार सुलभरित्या आणि योग्य पद्धतिने उपलब्ध व्हावे म्हणून हे पाऊल उचलले गेले आहे.



# आश्रम स्पंदन



## मेरी शरण मे आके देखो,
## मेरी दुआ अपनाके देखो ॥

# 15

याचा अर्थ  मला शरण येऊन पहा, माझी कृपा मिळवून पहा. परमेश्वराने आपल्यासाठी सर्वच करावे असे बऱ्याच लोकांना वाटत असते. त्याने जन्म दिला मग त्यानेच माझा संभाळ करावा पण मी मात्र मला पाहीजे तसेच करीन असे मानणारे महाभाग जगात भरपूर आहेत. परमेश्वर अस्तित्वात असता तर एवढे दु:ख जगात झालेच नसते असे म्हणून परमेश्वराचे अस्तित्वही नाकारणारेही लोक कमी नाहीत. नुकतीच एक कथा वाचनात आली. ती अशी:

युरोपातील एका देशात एक आधुनिक न्हावी आपल्या ग्राहकाशी गप्पा मारत त्याचे केस कापत होता. तो माणुस फार श्रद्धावान आणि प्रेमळ होता. त्याचा परमेश्वरावर अतीव विश्वास होता. परंतु तो न्हावी मात्र काही केल्या मानत नव्हत कि देव आहे. केश कर्तन पूर्ण झाल्यावर पुन्हा एकदा त्या न्हाव्याने त्या ग्राहकाला चिथवले. तो म्हणाला,  जर परमेश्वर जगात असता तर एवढे लोक दु:खी का? एवढे लोक आजारी का? ह्याचा अर्थ जगात परमेश्वर आहे आणि असला तरी तो दुबळा आहे.

ग्राहक काहीच न बोलता निघून गेला. परंतु साधारण तासाभरानंतर एका अस्ताव्यस्त दाढी आणि केस वाढलेल्या भिकाऱ्याला घेऊन दुकानात आला आणि मोठयाने ओरडून म्हणाला,  ह्या शहरात न्हावीच नाहीत असे दिसते आहे. न्हावी पुढे होऊन म्हणाला,  अहो महाशय, असे कसे म्हणता तुम्ही? मी आहे की येथे.  ग्राहक पुन्हा मोठयाने म्हणाला,  अरे मग ह्या माणसाच्या केसांची ही अस्ताव्यस्त अवस्था कशी झाली?  न्हावी म्हणाला,  महाशय, तो माझ्याकडे कधीच आला नाही. आला असता तर झकास केस कापले असते त्याचे.  ग्राहक आता हसून म्हणाला,  अरे, परमेश्वराची व्यथाही अशीच आहे. तो आहे, पण त्याच्याकडे कोणी गेलाच नाही तर तो दु:खे आणि वेदना दूर कशी करणार?  तो न्हावी खजील झाला आणि म्हणाला,  महाशय तुम्ही बरोबर आहात. मीच चुकलो होतो.

स्वामींचेही असेच आहे. परमेश्वर म्हणून त्यांनी मानवाला जन्म दिला. छान जगण्यासाठी सगळ्या गोष्टी दिल्या आणि द्वैतात

जन्म देऊन त्याला जन्मापासूनच एक पर्याय दिला. योग्य पर्याय स्वीकारून तो आपल्या आयुष्याला जोडून जीवन आनंदात व्यतित करायचे हे माणसाच्या हातात असते. परमेश्वर यात ढवळाढवळ करत नाही. पहिले पाऊल मानवाने टाकले कि तो सात पावले धावत येतो मानवाच्या मदतीला. पण ते पहिले पाऊल मात्र मानवाला टाकायला जमत नाही. त्याच्या अहंकाराचा आणि कर्त्याभावाचा त्याला विरोध होतो. प्रत्यक्ष दत्त महाराज सुद्धा सर्व सामर्थ्य असूनही भक्तांच्या दारात झोळी पसरून भिक्षा मागतात. नाते जोडायची त्याला संधी देतात. आणि हे त्या भक्ताला जमले कि आशिर्वादांची बरसात करत त्याचे आयुष्य बदलून टाकतात. स्वामी समर्थ येथे तेच म्हणत आहेत. ते सांगतात कि मला तू शरण ये आणि मग मला तुझे भले करायला, कल्याण करायला अधिकार प्राप्त होतो. मग बघ तुझे जीवन कसे उजळून टाकतो माझ्या आशिर्वादाने. शरण येण्याचा मूळ अर्थच अहंकाराचा त्याग करून ये, तुझ्या कर्तेपणाचा त्याग करून ये. जोपर्यंत तुझा अहंकार आहे तो पर्यंत परमेश्वर भक्ताच्या जवळपासही फिरकत नाही. अहंकाराचा त्याग हाच परमेश्वराला प्राप्त करण्याचा सर्वात सोपा मार्ग. जसे प्रत्यक्ष भगवान कृष्ण अर्जुनाला गीतेत सांगतात कि मी तुला आयुष्य समजावून सांगितले आहे. आता तू तुझा पर्याय निवड. रणातून पळून जा किंवा रणसंग्राम करून राजा बन. आयुष्य तुझे आहे आणि म्हणूनच पर्यायाची निवड तुझा अधिकार आहे. स्वामींच्या ह्या वाक्यात अहंकाराचा त्याग ही एकच बाब भक्ताने करावयाची आहे. मग स्वामी सगळे आयुष्यच सांभाळून नेतात.

# आगामी उपक्रमः रेकि शिबिरे

| दिनांक | रेकि शिक्षक | केंद्र/स्थान | श्रेणी | नोंदणीसाठी संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ व २ जानेवारी | राकेश कुमार | मुंबई (दक्षिण) | १ ली | शारदा गुरव (९८१९२१५६५०) |
| १ व २ जानेवारी | भारतीबेन | अहमदाबाद | १ ली | किनल पंड्या (९७१४५१५८३९) |
| ८ व ९ जानेवारी | सीमा त्रिवेदी | राजकोट | १ ली | निमिषा भट (९४२७७२६९१७) |
| ८ व ९ जानेवारी | अरूणा | बंगळूर | १ ली | कोमल पुकाळे (९८४५२७९८४०) |
| १५ व १६ जानेवारी | अजित सर | नाशिक | १ ली | मोनाली राक्षे (९४२०६९२१३६) |
| १५ व १६ जानेवारी | विशाल श्रीधनकर | पूणे | १ ली | अमृत कीरपेकर (९१७५०५०९००) |
| २२ व २३ जानेवारी | कल्पिता कीर | कुडाळ (पावशी) | १ ली | प्रकाश भोगटे (८९५६५०२०३९) |
| २२ व २३ जानेवारी | संगिता कुलकर्णी | बडोदा | १ ली | चंद्रेशभाई परमार (९९७४७०१२००) |
| २२ व २३ जानेवारी | विशाल श्रीधनकर | दिल्ली | १ ली | प्रिती खन्ना (९८७१११८९०६) |
| २२ व २३ जानेवारी | अजित सर | ठाणे | १ली | गिरीश कर्णिक (९८२०२६०२२९) |
| २९ व ३० जानेवारी | कल्पिता कीर | चिपळूण | १ ली | (जयंती काटदरे (९४०५८४९३६४) |